# GANDHI NATHA RANGJI
## HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE & HOSPITAL, SOLAPUR.

13, Budhawar Peth, Jain Boarding Campus, Balives, Solapur - 413 002.
Phone : College 0217-2624900/01 Prathisthan : 0217-2324187
Website : www.gnrhmcsolapur.org E-mail : gnrhmc09@gmail.com

Dr. SHRIDHAR P. PATIL
Principal M.D. (HOM.)

MUHS Code - 4210
DMER Code - 4117

Mr. SANJAY S. GANDHI
President

Ref. No. : /GNR/HMC/SUR/20 Date :

**Maharashtra University of Health Sciences, Nashik**
**Homoeopathy Faculty**

# Institute Information

**Trust Deed/ Registration Certificate Hospital Bombay Nursing Act**

| Sr. No. | Name of the Trust | Details |
|---|---|---|
| 01 | Registration Certificate & No. | **PTR – A-62**<br>**Date:- 13/02/1953**<br>**8752, 8753, 8754/1**<br>**Bombay Nursing Act:- 13A/105**<br>**Date:- 30/06/2006** |
| 02 | Name of the Trust | **Gandhi Natha Rangji Digambar Jain Jain Janmangal Pratishthan, Solapur** |
| 03 | Name of the College | **Gandhi Natha Rangji Homoeopathic Meidcal College & Hospital, Solapur** |
| 04 | Address | **13, Budhwar Peth, Jain Boarding Campus, Balives, Solapur** |
| 05 | E-mail ID | **gnrhmc09@gmail.com** |
| 06 | Telephone No. | **0217-2624900/2327040** |
| 07 | Website | **gnrhmcsolapur.org** |

Dr. SHRIDHAR P. PATIL
PRINCIPAL
Gandhi Natha Rangji Homoeopathic
Medical College, Solapur

नक्कल दाखल दिनांक 16-1-13
नकल तयार दिनांक ......
नकल घेण्यास दिनांक 22-2-13
नकल दिल्याचा दिनांक 1-3-13
नकल तयार करणार ......
नकल तपासणार करणार ......

# Certificate of Registration

10389

It is hereby certified that the public trust described below has this day been duly registered under the Bombay Public Trusts Act, 1950 (Bom. XXIX of 1950), at the Public Trusts Registration Office, Poona Region, Poona.

Name of Public Trust ...... Gandhi Natha Rangaji Digambar Jain Boarding School, Sholapur

Number in the Register of Public Trusts ...... A 62

Certificate issued to Shri Keshachand Harichand Gandhi

Given under my hand, this 13th day of Feb. 1953.

Signature ......
O. C. Assistant Charity Commissioner
Designation ...... Poona Region, Poona

(J) H 184A

Assistant Charity Commissioner, Solapur

..., Pune

सत्यप्रत
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
सोलापूर
1-3-13

योजना





[गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन बोर्डिंग स्कूल, सोलापूर सा. न्या. नों. क्र. ए-६२. [सोलापूर] व गांधी नाथा रंगजी दिगंबर जैनोन्नती फंड, अकलूज सा. न्यास नों. क्र. ए-१३१ [सोलापूर] ह्या दोन न्यासाचे एकत्रिकरण दिनांक: ३०/१०/१९९० च्या मुं. सा. वि. न्या. अधि १९५० च्या कलम ५०[अ] [२] खाली चौ. क्र. ६/८९ मध्ये केलेल्या आदेशाप्रमाणे एकत्रित न्यास "गांधी नाथा रंगजी, जैन जन-मंगल प्रतिष्ठान" सोलापूर ह्या न्यासाच्या सुसुत्र व चांगल्या व्यवस्थापनासाठी तयार करुन लागू केलेली योजना.]

सा. न्या. नों. क्र. ए-६२., सोलापूर.

१] न्यासाचे नांव : "गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन बोर्डिंग स्कूल, सोलापूर." सा. न्या. नों. क्र. ए-६२, [सोलापूर] व "गांधी नाथा रंगजी दिगंबर जैनोन्नती फंड, अकलूज" सा. न्या. नों. क्र. ए-१३१ [सोलापूर] ह्या दोन सार्वजनिक न्यासाचे एकत्रिकरण केल्यावर एकत्रित न्यास "गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जन-मंगल प्रतिष्ठान" सोलापूर ह्या नावाने ओळखला जाईल. ह्याच नावाने तो एकत्रित न्यास सा. न्या. नों.क्र. ए-६२, [सोलापूर] ह्या क्रमांकावर सार्वजनिक न्यास नोंदणी विभागीय कार्यालय, सोलापूर उपविभाग सोलापूर येथे मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० खाली पंजिबध्द [रजिस्टर्ड] केलेले राहिल.

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सोलापूर

२] न्यासाचे कार्यालय: सदरील न्यासाचे अधिकृत कार्यालय "१३, बुधवार पेठ, धाळोवेस, सोलापूर. -४१३ ००२." ह्या ठिकाणी राहील. विश्वस्तांना न्यासाची उप-कार्यालय काढण्याचा अधिकार असेल तसेच अधिकृत कार्यालय नवीन व योग्य ठिकाणी नेण्याचा/बदलण्याचा अधिकार असेल.

३] न्यासाची मालमत्ता व मिळकती : सदरील एकत्रित न्यासाची मालमत्ता दोन्ही न्यासाच्या परि. १ मध्ये नोंदविल्याप्रमाणे एकत्रित करुन झालेली मालमत्ता असेल. परि. १ मध्ये न्यासाची सर्व मालमत्ता नोंदविलेली नसेल तर त्यामध्ये झालेल्या बदलासह, नजर-चुकीने न दाखविलेली मालमत्ता ही सर्व मालमत्ता सदरील एकत्रित न्यासाच्या मालकीची होईल. तसेच न्यासाला मिळालेल्या/मिळणा-या उत्पन्न, देणग्या, बक्षीस व मालमत्ता बवृध्दी इत्यादी द्वारे मिळणारी मालमत्ता न्यासाची मालमत्ता राहील.

पान नं. २ वर...

(११९)

४] न्यासाच्या मालमत्तेचे रजिस्टर :विश्वस्तांनी न्यासाच्या मालमत्तेचे रजिस्टर मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ३६ [ब] मधील तरतुदिप्रमाणे ठेवावयाचे आहे. त्यामध्ये विश्वस्तांनी वेळोवेळी झालेले बदल नोंदवावयाचे आहे व सर्व मालमत्तेची वर्षातून एकदा पडताळणी करून मालमत्ते-बाबतचे प्रमाणपत्र अशा रजिस्टर मध्ये नोंदवावयाचे आहे.

५] न्यासाच्या मालमत्ते-ची/मिळकतीची मालकी व वहिवाट :सदरील एकत्रित न्यासाच्या सर्व चल/अचल मालमत्तेची मालकी न्यासाची राहील. अशा मालमत्तेची वहिवाट न्यासाच्या विश्वस्तांनी ह्या योजनेच्या नियमाप्रमाणे करावयाची आहे.

६] न्यासाचे उद्देश : सदरील न्यासाचे उद्देश खालील प्रमाणे राहतील. :-- "गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन बोर्डिंग स्कूल, सोलापूर" हा न्यास दिनांक १२-३-१९०८ रोजी केलेल्या विश्वस्त पत्राप्रमाणे व "गांधी नाथा रंगजी दिगंबर जैनोन्नती फंड" हा न्यास दिनांक:१९-५-१९०५ रोजी केलेल्या ट्रस्ट डीड प्रमाणे अस्तित्वात आले आहेत. त्या डीड मधील उद्देशांना अनुलक्षून सदरील एकत्रित न्यासाचे उद्देश असतील. त्यामधील दुमताबद्दल मूळ ट्रस्ट डीड विचारांत घेऊन योग्य तो निर्णय घ्यावयाचा आहे. विस्तारित उद्देश हे ही मूळ उद्देशाना अनुलक्षून केलेले आहेत.

१] [अ] सोलापूर शहरामध्ये दिगंबर जैन विद्यार्थ्यांच्या जैन धर्माच्या शिक्षणासाठी व धर्मातील शिक्षणासाठी "गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन बोर्डिंग स्कूल, चालविणे.

[ब] सदरील बोर्डिंग मध्ये विद्यार्थी वसतीगृह जैन विद्यार्थ्यांकरितां चालविणे व विद्यार्थ्यांकरिता राहण्याची जेवणाची, धार्मिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे.

[क] दिगंबर जैन विद्यार्थी/विद्यार्थींनी साठी निरनिराळ्या गावी वसतीगृहे काढणे/चालविणे/काढण्यास मदत करणे/ काढण्यात सहभाग करणे. जेथे अशी वसतीगृहे आहेत तेथील सुविधा अधिक चांगली करण्यासाठी मदत करणे.

[ड] दिगंबर जैन/जैनोन्नतीसाठी दिगंबर जैन/ विद्यार्थी/ विद्यार्थींनीसाठी

अ] संस्कृत भाषा व जैन धर्म शास्त्र विषयांत ज्ञान संपादण्या-साठी व संशोधनासाठी, ब] आंग्ल भाषा, संस्कृत भाषा व जैन धर्म शास्त्र विषय शिकणा-यांना शिष्यवृत्ती/त्या

देऊन आर्थिक मदत करणे. अशी शिष्यवृत्ती वार्षिक वरील [अ] साठी रु ३६००/- हून कमी [ब]साठी रु १८००/- च कमी असणार नाही.

[इ] दिगंबर जैन धर्म तत्वज्ञान, संस्कृत भाषा व जैन धर्म शास्त्र ह्या विषयामधील शिक्षणार्थीस आर्थिक मदत व शिष्यवृत्ती देणे. अशी मदत दरसाल रु १८००/- च्या कमी असणार नाही. [फ] दिगंबर जैन धर्म तत्वज्ञान, संस्कृत भाषा, जैन धर्म शास्त्र मध्ये संशोधन करण्यासाठी व जुने ग्रंथ [धर्म] पुनःमुद्रित करण्यासाठी आर्थिक मदत करणे. अशी मदत दरसाल रु १८००/- च्या खाली राहणार नाही.

टीप : वरील ड, इ व फ मधील कमीतकमी रक्कम त्यावर्षी खर्च झाली नाही तर उर्वरित रक्कम पुढील वर्षासाठी वर्ग करण्यांत येईल व त्यावर्षी ती तेवढी जास्त खर्च करावयाची आहे.

२] वरील उद्देश पूर्तीनंतर राहिलेल्या उत्पन्नातून वा खालील पैकी कोणत्याही उद्देशाकरिता विशिष्ठ निधी निर्माण केला वा जमविला तर त्यामधून खालील उद्देश पूर्तीकरिता खर्च करावेत :—

१] दिगंबर जैन समाजातील अनाथ महिला, अपंग अगर निराधार व वयोवृद्ध व्यक्तींना त्यांचा चरितार्थ चालविणेसाठी तसेच वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत करणे.

२] दिगंबर जैनधर्म तत्वज्ञानाचे नांवे अभ्यासक, संशोधक यांचा संस्थेच्या वतीने यथोचित सन्मान करून त्यांना पुरस्कार देणे तसेच मानधन देणे.

३] निरनिराळया जैन क्षेत्राच्या ठिकाणी क्षेत्र जिर्णोध्दारासाठी तसेच यांत्रिकरूंच्या सुखसोयी वाढविणेसाठी आर्थिक मदत करणे.

४] निरनिराळया ठिकाणी धर्म शाळा, सांस्कृतिक भवन, शास्त्र भांडार, मुनि-निवास, वैगरे बांधून देणे अगर अशा कामामध्ये सहभागी होणे.

५] दिगंबर जैन समाजातील गरजू लोकांना सवलतीच्या दरामध्ये उपचार होतील अशा त-हेचे दवाखाने, हॉस्पिटले उभे करणे, सध्या अस्तित्वात असणा-या दवाखान्यांना अगर हॉस्पिटलांना अशा त-हेच्या सवलतीने उपचार मिळणेसाठी आर्थिक मदत करणे.

पान नं. ४ वर

६] दिगंबर जैन धर्म तत्वज्ञानाची आवड लोकांत निर्माण होण्यासाठी पाठशाला, विद्यालय उघडणेस मदत करणे.

७] निरनिराळ्या इतर शैक्षणिक संस्था काढून त्यामध्ये विशेषत: जैन विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयी उपलब्ध होतील याकडे लक्ष ठेवणे

८] दिगंबर जैन समाजासाठी कार्य करीत असलेल्या संस्थेस त्यांचे कार्य प्रभावी करणेसाठी आर्थिक मदत करणे

९] ज्यायोगे जैन धर्म व समाज यांचे बद्दल समाजामध्ये आदरभाव निर्माण होईल व आपुलकी वाटेल असे विश्वस्तांना वाटेल त्या कामांना मदत करणे.

१०] वरील प्रमाणे धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, वैद्यकीय उपचारासाठी कार्य करून जैन समाजाचे उत्थापन करण्याच्या हेतूने ज्या ज्या गोष्टी करणे जरूरीचे आहे ती सर्व कामे करणे

११] शैक्षणिक उन्नती/प्रगतीसाठी ट्रस्ट तर्फे प्राथमिक, माध्यमिक, उच्च व महाविद्यालयीन शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक संस्था स्थापने, चालविणे, चालविण्यास घेणे व चालविण्यास मदत करणे अशा संस्थामध्ये दिगंबर जैन विद्यार्थिनी/विद्यार्थ्यांना प्राधान्य द्यावयाचे आहे. त्यानंतर जास्त उर्वरित जागासाठी इतर धर्मातील विद्यार्थी/विद्यार्थीनींना दुसरे प्राधान्य द्यावे.

_] संपत्तिक उभारणी : न्यासाच्या उद्देशाच्या पूर्तीसाठी लागणारी सांपत्तिक उभारणी खालील प्रकाराने करावी:—

१] देणग्या मिळविणे.

२] रोख, वस्तूच्या स्वरूपात, वास्तूच्या/जागेच्या स्वरूपात, खरेदीच्या स्वरूपात, शेअर्सच्या स्वरूपात, इतर मदतीच्या स्वरूपात

३] व्याज गुंतवणुकातून उत्पन्न, वर्गणी देणगी, अनुदान इ.

८] न्यासाचे विश्वस्त मंडळ व मंडळातील पदाधिकारी: १] सदर संस्थेचा कारभार पाहणेसाठी व करणेसाठी कमीत कमी चार विश्वस्त व जास्तीत जास्त सहा विश्वस्त [ट्रस्टीज] यांचे मंडळ असेल. सर्व विश्वस्त दिगंबर जैन समाजातील लोकांचे असावेत. सदर विश्वस्तापैकी कमीत कमी दोन व जास्तीत जास्त तीन हे नाथा रंगजी गांधी यांच्या घराण्यातील पुरुष संतती पैकी असणेचे आहेत.

२] सदर विश्वस्त मंडळामध्ये नाथा रंगजी गांधी

घराण्यातील एक विश्वस्त हा त्या विश्वस्त मंडळाचा "अध्यक्ष" म्हणून निवडला जाईल. तसेच नंतर पाच विश्वस्तामधून अध्यक्षांचे विचाराने/विश्वस्त मंडळ ने विश्वस्त मंडळाचा सेक्रेटरी निवडले - अध्यक्ष व सेक्रेटरीमध्ये एखादया विषयावर मतभेदाचे प्रसंग उद्‌भवल्या अध्यक्षांचे निर्णय निर्णायक समजावेत. संस्थेच्या सेक्रेटरीने अध्यक्षांचे विचार घेऊन त्यांचे संमतीने संस्थेचा कारभार चालवावा.

3] न्यासाचा विश्वस्त हा दिगंबर जैन समाजातुन कमीत कमी 30 वर्षे वयाने पूर्ण झालेला असेल. सदर न्यासाचा विश्वस्त हा त्याच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण होताच निवृत्त होईल.

४] जो विश्वस्त ६५ वर्षे पूर्ण झाली आहेत म्हणून म्हणजे ज्यांना नेमल्यापासून त्याच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण झाली आहेत तोपर्यंत विश्वस्त म्हणून काम केले आहे अशा निवृत्त विश्वस्ताला विश्वस्तांच्या सर्व सभाना/बैठकीना "सन्माननीय निमंत्रित" म्हणून हजर राहण्यास अजेंडा नोटीस द्यावयास पाहिजे. बैठकीना हजर राहून अशा सन्माननीय निमंत्रिताकडून विश्वस्तानी त्यांचे समोरील विषयावर मार्गदर्शन घ्यावे व त्यांचे विचार जाणून घ्यावे अशा विषयावर सन्माननीय निमंत्रिताला मतदान करता येणार नाही.

५] सदरील विश्वस्तापैकी जर कोणी राजीनामा दिला, त्याला काम करता येत नाही म्हणून विश्वस्त राहण्यास तो अपात्र झाला, सक्षम न्यायालयाने नादार म्हणून जाहीर केल्यास, धर्मादाय उपआयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्या पूर्व परवानगी शिवाय भारताबाहेर सलग ६ महिने पेक्षा जास्त काळ राहत असल्यास, त्याचा मृत्यू झाल्यास, नितिमत्ता कमी होणा-या गुन्हयामध्ये त्यास शिक्षा झाल्यास, त्याने दिगंबर जैन धर्माचा त्याग केल्यास वा इतर अन्य कारणाने विश्वस्ताची जागा रिकामी झाल्यास त्याचे ठिकाणी वरील नियम ८ [१] व ८[३] हयाना अनुलक्षून मागे राहिलेल्या विश्वस्तानी जरुरीप्रमाणे बहुमताने अशा कारणाने रिकाम्या झालेल्या जागी नवीन विश्वस्ताची नेमणूक करावी.

पान नं. ६ वर...

९] विश्वस्त मंडळाच्या बैठकी/सभा

: १] विश्वस्त मंडळाच्या सभा वर्षातून कमीत कमी एकदा घ्यावयास पाहिजे. आवश्यकतेनुसार अधिक सभा घेता येतील. एकूण दोन सभासदांना सभेची मागणी लेखी विषय नमूद करून अध्यक्षाजवळ करता येईल. अशी सभा लेखी मागणी आल्यापासून १५ दिवसाचे आंत बोलवावयाची आहे. त्या सभेत मागणी केलेल्या विषयावर चर्चा करून निर्णय घेता येतील.

२] सभेची नोटीस सर्व विश्वस्तांना सभेच्या अगोदर पूर्ण तीन दिवस द्यावयाची आहे. विषय पत्रिका नोटीस प्रत्यक्ष वा पोष्टाचा नोटीस टाकल्याचा दाखला घेऊन द्यावयाचा आहे. विश्वस्तांनी ह्या बाबत कांही पोटनियम केले तर नोटीस त्या नियमाप्रमाणे द्यावयाची आहे.

३] सभेच्या सन्माननीय निमंत्रितानाही वरील ९[२] प्रमाणे नोटीस पाठवावी.

४] सभेचे अध्यक्षपण न्यासाच्या अध्यक्षानी घेऊन सभा सूत्र चालन करावे. अध्यक्ष हजर नसले तर त्यांचे जागी त्या सभेपुरता हजर विश्वस्तांनी गांधी नाथा रंगजी घराण्यातील अन्य विश्वस्ताची व तोही हजर नसल्यास आपले मधून एकाची अध्यक्ष म्हणून निवड करावी.

५] सर्व विश्वस्तांना अध्यक्ष धरून एक मत प्रत्येक विषयावर देता येईल. जर सम समान मते पडली तर सभेच्या अध्यक्षाना एक जादा मत देण्याचा अधिकार राहिल.

६] विश्वस्ताच्या सभेचो गणपूर्ती तीन विश्वस्त हजर झाले वर होईल. गणपूर्ती झाली नाही तर सभेच्या दिवशी ठराविक वेळेनंतर ३० मिनिटांनी हजर सभासदांना सभा घेऊन विषय पत्रिकेवरील विषयावर निर्णय घ्यावेत. अशा सभेला हजर सभासद हीच गणपूर्ती संख्या असेल. अशा सभेत विषय पत्रिके बाहेरचे विषय चर्चेस घेता येणार नाहीत.

७] एकदा तातडीच्या वा नियमित विषयावर विश्वस्तांना परिपत्रिकाद्वारे ठराव करता येईल. असा ठराव सर्व संमत असला पाहिजे. तसे नसेल तर त्या ठरावावर पुढील सभेत निर्णय नेहमीप्रमाणे बहुमताने घेता येईल.

८] विश्वस्ताचे सर्व ठराव बहुमताने पास/पारित करता येतील.

संमत करावा व संमत झाल्यावर त्या सभेच्या अध्यक्षांनी तशी नोंद वृत्तांतपेहाला ठेवावी. परिपत्रित ठरावाची नोंद ह्या मिनीट बुकात ठेवावी.

**१०] न्यासाचे हिशोब अंदाजपत्रक, बँक खाती इत्यादी.**

: १] न्यासाचे हिशोब विश्वस्तांनी नियमित व चोख ठेवले पाहिजे. असे हिशोब वर्षानंतर ४ तपासून घेऊन संमत करून सादर केले पाहिजेत. सनदी लेखापालांनी केलेल्या सूचना अंमलात आणल्या पाहिजे.

२] न्यासाचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे असेल.

३] विश्वस्तांनी नवीन वर्ष सुरू होण्याच्या अगोदर १ महिना अगोदर न्यास न्यासाच्या सर्व शाखाचे अंदाज पत्रक करून मंजूर केले पाहिजे. ते कायद्याच्या तरतुदीप्रमाणे करावयाचे आहे.

४] न्यासाच्या नावे एक वा अनेक बँक खाती विश्वस्ताना उघडता येतील. अशी खाती कमीत कमी दोन विश्वस्तांच्या सहीने चालवावीत. त्याबद्दलचे ठराव विश्वस्तांनी वेळोवेळी करून कोणा कोणाच्या नांवे खाते असावे व त्यापैकी कोणाच्या सह्या असाव्यात हे ठरवावे.

**११] न्यासाचा निधी व त्याची गुंतवणूक, उत्पन्नाची साधन**

: १] न्यासाचे निरनिराळे निधी असतील त्यामध्ये देणग्या व व्याज ह्यापासून उत्पन्न होईल.

२] न्यासाच्या कामाला लागणार नसतील अशी रोकड रक्कम तसेच न्यासाच्या कायम वा भांडवली निधींची रक्कम विश्वस्तांनी कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुंतवणूक करण्याचा अधिकार त्यांना आहे.

३] न्यासाला त्याच्या मालमत्तेपासून मिळणारे जागाभाडे उत्पन्न, व्याज, देणग्या, अनुदान व इतर वैध मार्गानी निधी उभारता येईल.

**१२] विश्वस्त मंडळाची कर्तव्ये व अधिकार**

: १] विश्वस्त मंडळानी न्यासाच्या उद्देशपूर्तीसाठी व जास्तीत जास्त रीतीने लाभधारकाना लाभ करून देण्याच्या दृष्टीने काम करावयाचे आहे.

२] विश्वस्तानी न्यासाच्या व्यवहारांत लक्ष घालावयाचे आहे. सर्वसाधारण बुध्दीची व्यक्ती जशी स्वत: व्यवहारासंबंधी/

मालमत्तेसंबंधी व्यवहार करील तसेच व्यवहार न्यासाच्या बाबतीत करावयाचा आहे.

३. विश्वस्तांना न्यासाची मालमत्ता मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९ ५० च्या तरतुदींना आधीन राहून हस्तांतरित म्हणजे विक्री, दीर्घ मुदतीच्या भाडेपट्यानी, अदलाबदलीनी इत्यादी रीतीने करण्याचा अधिकार राहील.

४. विश्वस्तांना न्यासासाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदींना आधिन राहून कर्ज काढणे, न्यासाची मालमत्ता गहाण ठेवणे, त्यावर व्याज देणे ना देणे इत्यादि अधिकार राहतील.

५. विश्वस्तांना न्यासाच्यासाठी नोकरवर्ग नेमणे, नेमलेल्या नोकर वर्गाच्या नोकरीच्या अटी निश्चित करणे, नेमलेल्या नोकरांना कमी करणे वा निलंबित करणे, नोकरीच्या व अटींमध्ये वेळोवेळी आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार असतील.

६. न्यासाच्या उद्देश पूर्तीसाठी विश्वस्तांना जरूर वाटेल तेव्हा व त्या त्या कार्यासाठी उप समिती/त्या नेमण्याचा अधिकार असेल. अशा प्रकारे नेमलेल्या उप समिती बरखास्त करणे, पुनर्घटित करणे, त्यांच्या कामकाजाच्या कार्यकक्षा ठरविणे, त्यामध्ये बदल करणे, कामकाजासाठी उप नियम करून देणे व त्यामध्ये वेळोवेळी बदल करणे इत्यादि सर्व अधिकार विश्वस्तांना राहतील. सर्व नेमलेल्या उप समित्या विश्वस्त मंडळाच्या आधीन व अखत्यारीत राहतील. सर्व उप समित्यांचे/मंडळाचे या न्यासाचे अध्यक्ष व सचिव हे पदसिद्ध अध्यक्ष व सचिव असलेच पाहिजेत. अशा उपसमित्यावर विषयानुसार तज्ञांना नेमण्याचा/काढण्याचा/बदलण्याचा अधिकार या न्यासाच्या विश्वस्त मंडळाला असेल. उपसमिती कडून त्यांच्या कामाचा अहवाल मागविणे व त्यावर विचार करून आवश्यक ते मार्गदर्शन करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाला राहील. अशा उपसमितीमध्ये आवश्यक वाटल्यास त्या त्या क्षेत्रातील जैनेतर व्यक्तींना सभासद म्हणून सामावून घेतले जाईल. या उपसमितीतील सभासदांना वयाची अगर धर्माची बंधन [अट] असणार नाही.

७. न्यासाच्या उद्देशपूर्तीसाठी व न्यासाच्या दैनंदिन

व्यवहारपूर्तीसाठी विश्वस्त मंडळाला पोटनियम करण्याचे, त्यामध्ये वेळोवेळी बदल करण्याचे वा केलेले पोटनियम रद्द करण्याचे अधिकार असतील.

८] उप समितीला न्यासा तर्फे कोणतीही आर्थिक जबाबदारी घेता येणार नाही. त्याना न्यासा तर्फे कोणतेही करार मदार करण्याचे अधीकार रहाणार नाही. समिती विश्वस्त मंडळाला पूरक असेल. व सर्व व्यवहार विश्वस्त मंडळच न्यासा तर्फे मंजूर करते वा करेल.

९] विश्वस्त मंडळानी वेळोवेळी दिलेले निर्देश व मार्गदर्शन उपसमित्यावर बंधनकारक असेल. व अशा बाबतीत विश्वस्त मंडळाचा निर्णय अंतिम निर्णय असेल.

१०] विश्वस्त मंडळ व नेमलेल्या सर्व उपसमित्या ह्यांची एक वार्षिक सभा घेण्यात येईल. त्यावेळी उपसमित्या तर्फे एक सभासद आपापले अहवाल अडचणी, सूचना सादर करतील. त्यावर अशा सभेमध्ये चर्चा होईल. अशी चर्चा झाल्यावर विश्वस्त मंडळानी निर्णय घ्यावयाचेच आहेत.

११] विश्वस्त मंडळ व उपसमिती ह्याच्या संयुक्त सभा आवश्यकतेनुसार बोलावण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास असेल.

२] सेक्रेटरीचे अधिकार व कर्तव्ये :

१] संस्थेचे विश्वस्त मंडळाचे ठरावाची अध्यक्षांचे सल्याने अम्मलबजावणी करणे.

२] नियामक उपसमितीचे मंडळाचे कामकाजावर लक्ष ठेवून त्यांचे ठराव आर्थिक तरतूदी याची माहिती घेऊन तिचा कमिटीपुढे अहवाल ठेवणे व वेगवेगळी माहिती देणे.

३] संस्थेच्या निरनिराळ्या कार्याबाबत विश्वस्त मंडळाचा दृष्टीकोन, ठराव यांची माहिती नियामक मंडळाना वेळोवेळी मीटींगचे वेळी समक्ष व बाकीचे वेळी पत्राने देणे.

४] उपसमिती व विश्वस्त मंडळ यामध्ये सलोखा राहून संस्थेचे कार्य समाजाचे उपयोगी पडेल याकडे लक्ष देणे.

५] संस्थेमधील सर्व कार्याची, घटनांची व समाजातील घडामोडींची माहिती वेळोवेळ अध्यक्षांना देणे व त्यांचे सल्याप्रमाणे निर्णय घेणे.

६] संस्थेच्या हिशोबाच्या वह्या ठेवणे, नोकरवर्ग नेमणे, नोकरवर्गाच्या कामाची आखणी करणे, नियम करणे, देखरेख ठेवणे, विश्वस्त व नियामक मंडळाच्या सभा बोलाविणे वगैरे कामे स्वत: करावयाची आहेत व जरूरी

पान नं. १० वर ....

(211)

प्रमाणे सेवक वर्ग नेमून पूर्तता करून घेणेची आहेत.

७]संस्थेच्या उत्पन्न खर्चाचे बजेट तयार करणे व विविध कामासाठी व विभागासाठी खर्चाच्या जरूरीचा वा मागणीचा विचार करून त्यासाठी संस्थेतर्फे आर्थिक तरतूदीबाबत विश्वस्त कमेटीस शिफारस करणे त्याचप्रमाणे व मागील वर्षातील कार्याबाबत व आर्थिक स्थितीबाबत सविस्तर अहवाल तयार करून विश्वस्त कमेटीपुढे ठेवणे. संस्थेच्या सेक्रेटरीकडून त्यांच्याकडे असलेली कामे व्यवस्थित पार पाडावी म्हणून अध्यक्ष व सेक्रेटरी यांचे विचाराने सहाय्यक सेक्रेटरींची निवड विश्वस्त कमेटी करेल. सहाय्यक सेक्रेटरींनी त्यांना सोपविलेली कामे सेक्रेटरीचे व अध्यक्षांचे सल्याप्रमाणे पूरी करावयाची आहेत व त्या बाबतची माहिती सेक्रेटरींना व अध्यक्षांना देणेची आहेत.

१३] योजनेच्या कलमाच्या अर्थासंबंधी व त्याप्रमाणे करावयाच्या कामाच्या कायदेशीरपणा विषयी : ह्या योजनेतील कोणत्याही कलमाविषयी वा करावयाच्या कामाच्या कायदेशीरपणा विषयी काही शंका निर्माण झाली/ बुगत झाले तर सर्व माहिती देऊन अर्ज धर्मादाय उप आयुक्त पुणे विभाग, पुणे ह्याचे सोलापूर कार्यालयाकडे करावा. त्यावर त्यांनी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेऊन तो त्याचा अंतिम निर्णय असेल व विश्वस्ताना बंधनकारक असेल.

१४] ह्या योजनेचे बदल करणे : योजनेच्या कलमांमध्ये बदल करणे असल्यास विश्वस्तांनी ठराव करून योजनेत बदल करून देण्यासाठी अर्ज कलम ५० अ [२] मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० खाली अर्ज करावा. त्या अर्जावरील आदेशाप्रमाणे योजनेत बदल होतील.

सोलापूर

दिनांक: ३० ऑक्टोबर १९८९

[signature]

[ स. म. पेंडसे ]
धर्मादाय उप आयुक्त
पुणे विभाग पुणे.

ASSISTANT CHARITY COMMISSIONER * SOLAPUR REGION * SOLAPUR

नक्कल तयार करणार ...
नक्कल तपासणार ...
नक्कल तपासणार ...

प्रमाणित सत्य प्रत

अधीक्षक 29-3-88